**National Journal of Geography** {Impact Factor 1.906 (IIFS)}
**Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika**
Vol. XXXI, No.2, Jul-Dec. 2014, pp 28-30
ISSN : 0971-6785

# THE STUDY OF CHANGING LAND USE CHANGING PATTERN IN NASHIK DISTRICT

Bharat Patil Kisan Nagare

***Abstract***

*In this research paper Nashik District is a leading District is not only Maharashtra but also in India .In this research paper study of changing cropping pattern and landuse pattern. In Nashik district there is 49.53% area suitable for farming. In this area mainly grapes, onion, sugarcane, jowar, bajar, wheat, vegetables, fruits, crops are taking. Comparatively 1991 and 2011 there are many changes in cropping pattern due to Morden farming method, increasing irrigations systems and urbanization .*

***Key words:*** *vegetables, fruits, food crops, cash crops, irrigations, landuse etc.*

# नाशिक जिल्हातील कृषी पिकांचा -भूमी बदलाचा अभ्यास

**प्रस्तावना :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. जगातील अर्थव्यवस्थेमध्ये भारताची महत्वपूर्ण भूमिका आहेत. कृषी विकासात भारताची प्रगती उल्लेखनिय आहे. भारताचा स्थूल देशातर्गत उत्पन्नात (GDP) कृषी क्षेत्राचा वाटा २९.९३ % एवढा आहे. (RBI Report) कृषीभूमी उपाययोजनावर प्राकृतिक, सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक घटकांचा प्रभाव असतो. (Hushen 2010) मानवी गरजानुसार भूमीच्या वापरात बदल घडून येत असतात. भूमी हि स्थिर आहे. पण तिचा वापर सुद्धा काळजीपूर्वक केला पाहिजे. या सर्वांचा अभ्यास प्रस्तुत शोध निबंधात केलेला दिसतो.

**अभ्यास क्षेत्र :**

सह्याद्रीच्या कुशीत उगम पावणाऱ्या गोदावरी नदीच्या तीरावर नाशिक हे शहर वस्लेले आहे. नाशिक जिल्हा महाराष्ट्राच्या उत्तर भागात १९.३३ ते २०.५३ उत्तर अक्षांश आणि ७३.१६ ते ७५.१६ पूर्व रेखांश या पट्यात वसलेले आहे. अभ्यास क्षेत्राचे एकूण क्षेत्रफळ १५,५३० चोरस कि.मी. आहे. राज्याच्या एकूण क्षेत्रापैकी ५.०४% क्षेत्र व्यापलेला या जिल्ह्याचा राज्याचा एकूण क्षेत्रफळाचा विचार करता राज्यात तिसरा क्रमांक आहे. जिल्ह्याचे क्षेत्र साधारणतः तीन प्रमूख खोऱ्यामध्ये विस्थारलेला आहे. १) गोदावरी खोरे व पूर्व दक्षिण भाग २) तापी खोरे उत्तर व दक्षिण विभाग ३) दमणगंगा खोरे पश्र्िचम भाग इ. या जिल्ह्यातील सर्व नद्या सह्याद्री पर्वतात उगम पावतात. या जिल्ह्यातील नद्याचे प्रमूख वैशिष्टे जिल्ह्यातील सर्व नद्या जिल्ह्यातच उगम पावतात. एकही जलप्रवाह जिल्ह्याबाहेरून जिल्ह्यात येत नाही. यामध्ये नाशिक जिल्ह्याच्या सीमा या महाराष्ट्रातील ५ जिल्हे व गुजरात मधील २ जिल्हे यामध्ये जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर धुळे, ईशान्येला जळगाव, अग्नेयाला औरंगाबाद , दक्षिणेस अहमदनगर, पश्चिम व नैऋत्य ठाणे, वायव्य दिशेला डांग व सुरात हे जिल्हे आहेत. जिल्ह्याची उत्तर दक्षिण लांबी १२० कि. मी. असून पूर्व पशिम लांबी २०० कि. मी. आहे. नाशिकमध्ये गोदावरी,गिरणा, वेतारणा, मोसम, दारणा,मन्याड, आणि कादवा या नद्या महत्वाच्या आहे. जिल्ह्यातील सरासरी तापमान ३८ ते ४० सें. पर्यंत असते. सरासरी पर्जन्य ११०७ मी. मी. (२०१०–२०११) इतके नोंदले.

जिल्ह्याचा लोकसंखेचा विचार केल्यास २०११नुसार एकूण लोकसंख्या ६१,०९,०५२ असून राज्यात ४ क्रमांक आहे. लोक्संखेची घनता ३९३ इतकी आहे.

**उदिष्टे :**

नाशिक जिल्ह्यातील विविध कृषी पिकांचा व भूमी वापरातील प्रकारचा तसेच बदलाचा अभ्यास करून तुलना करणे.

**सांख्यीकिय माहिती व अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम स्वरूपाच्या माहितीचा वापर केला असून या कमी नाशिक जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन पुस्तिका व निरीक्षण पद्धत तसेच जिल्हा परिषद कार्यालय कृषी विभाग येथून माहितीचे संकलन केलेले आहे.

**विषय संकल्पना आणि विश्र्लेषण:**

प्रस्तुत शोध निबंधात कृषी पिकांचा व भूमी बदलांच्या प्रकारच्या अभ्यास हा प्रत्यक्ष १९९१ ते २०११ यामधील फरकावर आधारित आहे.१९९१ च्या तुलनेत २०११ मध्ये झपाट्याने नागरिकरण वाढल्यामुळे कृषयोग्य जमीन शहराच्या जवळपास वाढलेली आहे.

**सारणी क्र.१**

| अ. न. | वाव | परिमाण | १९९०-९१ | २000-0१ | 0१0-११ |
|---|---|---|---|---|---|
| १ | ओलिताखालील क्षेत्र | शंभर हेक्टर | ३२0६ | ३२0६ | २४५५ |
| २ | लागवडीलायक क्षेत्र | शंभर हेक्टर | १0१९२ | १0१९२ | ८८0३ |
| ३ | ओलिताखालील क्षेत्राची एकूण टक्केवारी | शंभर हेक्टर | - | ६.९२ | १७.९१ |
| ४ | लागवडीखालील क्षेत्राची एकूण टक्केवारी | शंभर हेक्टर | - | २५.४३ | ५१.७५ |

वरील सारणी क्र.१ मध्ये निरीक्षणावरून असे आढळून आले कि जिल्ह्यातील ओलिताखालील क्षेत्र हे १९९०/१९९१ मध्ये ३२0६ (हेक्टर) तेच २000-२00१ मध्ये ३२0६(हेक्टर) होते. परंतु २0१0-२0११ मध्ये हे २४५५ (हेक्टर) होते. म्हणजे १९९० च्या तुलनेत २0११ मध्ये ७५१ (हेक्टर) इतके क्षेत्र कमी झाले. त्याचबरोबर लागवडीलायक क्षेत्र बघितल्यास १९९०-१९९१ मध्ये १0१९२ (हेक्टर) तेच २0११मधे ८८0३ (हेक्टर) इतके झाले. यातील फरक १३८९ (हेक्टर) इतके कमी झाले. याचाच अर्थ वाढते नागरीकरण आणि शेतीचा ओद्योगिक वापर वाढत चालेला दिसून येतो.

**सारणी क्र.२**

| अ. न. | वाव | परिमाण | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|
| १. | तुणधान्य | शंभर हेक्टर | ७०४० | ६१६६ | ४६३५ |
| २. | कडधान्य | - | १४१० | १७१७ | ७८१ |
| ३. | तेलबिया | - | ४७० | ३६३ | २६५ |
| ४. | उस | | ३०० | ३१३ | २५३ |
| ५. | कापूस | - | २० | ८७ | ०० |

सारणी क्र. २ मध्ये एकूण कृषी पिकाखालील क्षेत्राचा विचार करता हे धनात्मक नसून ऋणात्मक आहे. तृणधान्य पिकाच्या क्षेत्रात १९९०-१९९१ मध्ये ७०४० (हेक्टर) २०१०मध्ये ६१६६ (हेक्टर) तर २०१०-२०११मधे ४६३५ (हेक्टर) इतके होते. तशेच कडधान्य १९९०-९१ मध्ये १४१०, २०१०-२०११मधे ७८१, इतका फरक पडलेला दिसतो. तशेच तेलबिया मध्ये १९९०-१९९१ ला ४७० हेक्टर तेच २०१०-२०११ ला २६५ हेक्टर इतके झाले. त्याच्पाधातीने उषाच्या क्षेत्रात १९९०-१९९१मध्ये ३०० हेक्टर होते. कापसाची सुद्धा तिच परिस्थिती पाहायला मिळते.

**निष्कर्ष :-**

संपूर्ण जिल्ह्याचा विचार करता जिल्ह्यामध्ये भूमीच्या वापरामध्ये झालेला बदल आणि पिकांच्या क्षेत्रामध्ये झलेला बदल जाणवतो. वरील सर्व मुद्याचा अभ्यास केला असता कृषी पिकामध्ये घट झालेली दिसून येते. वाढत्या शहरीकरण व नागरीकरणामुळे जिल्ह्यात बांधकाम व्यवसाय हा वेगाने वृद्धींगत होत आहे. त्यामुळे नवीन वसाहत, नगरे, यांच्यासाठी शहराशेजारील जमीन छ. करून वापरल्या जात आहे. त्यामुळे वाढती लोकसंख्या व वाढते शहरीकरण यांचा परिणाम कृशियोग्य जमिनीवर होताना दिसतो. त्याचबरोबर ग्रामीण भागातही नगदी पिके आणि जमिनीवर ओद्योगिक क्षेत्राचा कब्जा यामुळे भूमी वापराच्या पद्धतीत आणि **त्यामुळे पिकाच्या पद्धतीत तुलनात्मक बदल झालेला दिसतो.**

**संदर्भ साहित्य-**

१) Jashbir sing- 1976 n gricultural Geography Of Haryana vishal publication

२) Majjid Hushen - 2004 Systimatic agricultural geography rawat pub.

३) प्रफुल्ल ठाकरे व डॉ. उत्तम निळे जळगाव जिल्ह्यातील कृषी भूमी बदलाचा भौगोलिक अभ्यास

४) जिल्हा व सामाजिक आर्थिक समालोचन

* **डॉ.पाटील भारत दगा.**
शिरपुर विद्यालय

** **नागरे किरण शिवाजी**
येवला